<u>**प्रेसनोट**</u>

दि.०७/११/२०२२

**चतु:श्रृंगी पोलीस स्टेशन, पुणे शहर येथील पोलीस अंमलदारांवर
लाच स्वीकारले प्रकरणी कारवाई**

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| गुन्हा नोंद क्रमांक | चतु:श्रृंगी पोलीस स्टेशन, पुणे शहर गु.र.नं. ४८४/२०२२ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम – ७ |
| तक्रारदार | पुरूष, वय – २१ वर्षे |
| आरोपीचे नाव व कार्यालय | लोकसेवक – <br>१. प्रशांत विठ्ठल जाधव, वय - ५० वर्षे, पद – पोलीस हवालदार चतु:श्रृंगी पोलीस स्टेशन, पुणे शहर <br>२. अजित शांताराम गायकवाड, वय - ३७ वर्षे, पद – पोलीस शिपाई, - संलग्न वाहतूक विभाग, चतु:श्रृंगी, पुणे शहर |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | सुरूवातीस ५०,०००/- रूपये तडजोडीअंती २५,०००/- |
| स्वीकारलेली लाच रक्कम | २५,०००/- ( पंचवीस हजार रूपये) |

पडताळणी दिनांक :- दि. ०३/११/२०२२
सापळा दिनांक व ठिकाण :- ०६/११/२०२२, औंध पोलीस चौकीजवळ.

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदारांच्या आतेभावाचे विरूद्ध चोरीचा गुन्हा दाखल करावा लागेल असे सांगून चोरीचा गुन्हा दाखल न करण्यासाठी आरोपी लोकसेवक प्रशांत जाधव व अजित गायकवाड यानी ५०,०००/- रूपये लाचेची मागणी केल्याची तक्रार ला.प्र.वि. पुणे येथे दिली.

सदर तक्रारीची पडताळणी केली असता आरोपी लोकसेवक प्रशांत जाधव व अजित गायकवाड यांनी तक्रारदार यांच्या आतेभावाचे विरूद्ध चोरीचा गुन्हा दाखल न करण्याकरीता तक्रारदार यांचेकडे सुरूवातीस ५०,०००/- रूपये लाच मागणी करून तडजोडीअंती २५,०००/- रूपये लाचेची मागणी करून आरोपी लोकसवेक क्रमांक १ जाधव यानी लाच रक्कम स्वीकारली असता त्या दोघांना अटक करण्यात आले असून त्यांना मा. विशेष न्यायालय, पुणे येथे हजर केले असता त्यांना दिनांक ०९/११/२०२२ रोजी पर्यंत पोलीस कस्टडी रिमांड मंजूर केली आहे.

ला.प्र.वि. पुणे युनिटच्या पोलीस निरीक्षक प्रणेता सांगोलकर तपास करत आहेत.

सदरची कारवाई मा.पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. राजेश बनसोडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. सुरज गुरव, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

शासकीय अधिकारी, कर्मचारी / लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. राजेश बनसोडे, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी केले आहे.

२५.<u>हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४</u>
२६.ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
२७.व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
२८.व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
२९.ई-मेलआयडी - पुणे **dyspacbpune@mahapolice.gov.in**
३०.वेबसाईट - **www.acbmaharashtra.gov.in**
७. ऑनलाईन ॲप तक्रार - **www.acbmaharashtra.net.in**

(श्रीहरी पाटील)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे.